कोकणसाद
www.kokansad.com

सोमवार दि. २५ एप्रिल २०२२

# 'तिळारीतील जैवविविधतेवरील मानवी आक्रमणे थांबविण्याची गरज'

कोकणसाद वृत्तसेवा

**दोडामार्ग** : तिलारी नदीचे खोरे जैवविविधतेच्या दृष्टीने अत्यंत समृद्ध असून, त्यावर मागील काही वर्षांपासून मानवी आक्रमण वाढत आहे, ते थांबले पाहिजे. या परिसराचे रक्षण झाले पाहिजे, असे प्रतिपादन बेळगाव येथील पर्यावरण अभ्यासक राहुल खानोलकर यांनी केले.

दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात आयोजित केलेल्या तिलारी परिसरातील जैवविविधता या विषयावर ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, पर्यावरण अभ्यासक अमित सुतार, वनश्री फाऊंडेशनचे संजय सावंत, भूगोल विभाग प्रमुख डॉ. पी. डी. गाथाडे उपस्थित होते.




**दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात आयोजित केलेल्या तिलारी परिसरातील जैवविविधता या विषयावर बोलताना पर्यावरण अभ्यासक राहुल खानोलकर. व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, पर्यावरण अभ्यासक अमित सुतार, वनश्री फाऊंडेशनचे संजय सावंत, भूगोल विभाग प्रमुख डॉ. पी. डी. गाथाडे.**

खानोलकर पुढे म्हणाले की, महाराष्ट्रातील मायरीस्टीकाचे एकमेव जंगल कीटकभक्षी वनस्पती तिलारी परिसरात आहेत. येथे झाडावरचे बेडूक व रंग बदलणाऱ्या वनस्पती आहेत. या परिसरात चार ते पाच हजार प्रकारचे कीटक, सात ते आठ प्रकारचे विंचू, २०० पेक्षा अधिक फुलपाखरू, भारतातील सर्वात मोठे दोन नंबरचे फुलपाखरू आणि जगातील सर्वात मोठा पतंग तिलारी परिसरात आहे. ३० पेक्षा अधिक बेडकांच्या जाती आणि गांडूळसारखे सरपटणारे बेडूक येथेच आहेत. दहा ते बारा प्रकारच्या पाली, तीन ते चार प्रकारचे किंगफिशर, सहा ते सात प्रकारची घुबडे आणि स्वर्गीय नर्तक आहेत.

येथे अनेक प्रकारची वटवाघुळ आढळत असून एक वटवाघुळ एका तासात ५०० पेक्षा अधिक मच्छरांना खातो. त्यामुळे हा प्राणी मानवासाठी लाभदायक आहे. खोकडे, रानकुत्रे, तरस, गवे, भेकर, हरीण, अस्वल, डुक्कर आणि पट्टेरी वाघ हे सर्व प्राणी मोठ्या प्रमाणात तिलारी परिसरात सापडतात. म्हणून या सर्वांचे जतन होणे गरजेचे आहे, असे ते म्हणाले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत म्हणाले की, मुळातच समृद्ध असलेल्या तिलारी परिसराचे रक्षण व संवर्धन आपल्यासारखे तरुण कार्यकर्ते करीत आहेत, ही कौतुकाची गोष्ट असून, यापुढे आमचे महाविद्यालयही आपल्या सोबत अशा प्रकारचे काम करेल, असे आश्वासन देऊन येणाऱ्या काळात हा परिसर दिवसेंदिवस समृद्ध कसा होईल, यासाठी प्रयत्न करूया असे म्हणाले.

यावेळी संजय सावंत यांनीही मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन भूगोल विभाग प्रमुख डॉ. पी. डी. गाथाडे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार प्रा. श्रीपाद पाडगावकर यांनी मानले.